
अ.भा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती

# जादूटोणाविरोधी

# कायदा चीत्रवली

चित्रकार - सुर्यकांत



अंधश्रद्धा निर्मुलना च्या कार्यात झोकून दिलेल्या
तमाम कार्यकर्त्यांसाठी.
आणि ज्यांना अंधश्रद्धांच निर्मुलन व्हावे
व समाजात वैज्ञानिक दृष्टीकोण रुजावा असे वाटणाऱ्या
सर्व सुबुद्ध नागरिकांसाठी.
- सुर्यकांत जाधव

## संपादन-अभाअनिस मुंबई विभाग


मांडणी सजावट
आणि  चित्रे -
सुर्यकांत जाधव

हेपुस्तक अभानिस तर्फे कार्यकर्त्यांसाठी
प्रसिद्ध करण्यात आलेले आहे

अंधश्रद्धा सोडा  देश बलवान बनवा ....

पत्र व्यवहाराचा पत्ता -
www.abans.org.in/

स्वागत मुल्य - १५ रू.




भूत उतरवण्याच्या बहाण्याने एखाद्या व्यक्तिला दोराने किंवा साखळीने बांधून मारहाण करणं, मिरचीची धुरी देणं, तिला पादत्राणे भिजवलेले पाणी प्यायला लावणं, त्या व्यक्तिला उघड्यावर लैंगिक कृत्य करण्याची जबरदस्ती करणं, त्याचा विविध प्रकारे छळ करणं, चटके देणं, मूत्रविष्ठा खायला लावणं अशी कृत्यं गुन्हा ठरतील.

अ.भा. अंधश्रध्दा निर्मूलन समिती




एखाद्या व्यक्तिने तथाकथित चमत्कारांचा प्रयोग प्रदर्शित करून त्याद्वारे आर्थिक प्राप्ती करणं आणि अशा तथाकथित चमात्करांचा प्रसार व प्रचार करून लोकांना फसवणं, ठकवणं, त्यांच्यावर दहशत बसवणं, त्याद्वारे आर्थिक प्राप्ती करणं गुन्हा ठरेल.

अ.भा. अंधश्रध्दा निर्मूलन समिती




अलौकिक शक्तीची
कृपा मिळविण्याच्या
हेतुने, ज्यामुळे
जीवाला धोका
निर्माण होतो अथवा
शरीराला जीवघेण्या
जखमा होतात,
अशा अमानुष,
अनिष्ट, अघोरी
प्रथांचा अवलंब
करणं आणि अशा
प्रथांचा अवलंब
करण्यास इतरांना
प्रवृत्त करणं, उत्तेजन
देणं किंवा सक्ती
करणं हा गुन्हा.


अ.भा. अंधश्रध्दा निर्मूलन समिती




मौल्यवान वस्तु,
गुप्तधन आणि
जलस्त्रोत यांचा
शोध घेण्याच्या
बहाण्याने,
जारणमरण, करणी,
भानामती या नावाने
अमानुष, अनिष्ट
आणि अघोरी कृत्य
आणि जादूटोणा
करणं आणि यांच्या
नावाने नरबळी
देणं किंवा देण्याचा
प्रयत्न करणं किंवा
अशी अमानुष कृत्यं
करण्याचा सल्ला
देणं हा गुन्हा.


अ.भा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती

# कलम ५





आपल्या अंगात अतिंद्रिय शक्ती अथवा एखाद्या व्यक्तित अतिंद्रिय शक्ती संचारली असल्याचा आभासं निर्माण करून इतरांच्या मनात भीती निर्माण करणं आणि त्या व्यक्तिचे सांगणे न ऐकल्यास वाईट परिणामाची धमकी देणं, फसवणं, ठकवणं हा गुन्हा असेल. केवळ अंगात येणं हा गुन्हा नाही.

अ.भा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती




एखादी विशिष्ट
व्यक्ती करणी करते,
जादूटोणा करते,
भूत लावते किंवा
मंत्रतंत्राने जनावरांचं
दूध आटवते,
असं सांगुन त्या
व्यक्तीबाबत तसा
संशय निर्माण
करणं, अपशकुनी
आहे, सैतान आहे
असं जाहीर करणं.
अशा व्यक्तीचे जगणं
मुश्किल करणं,
त्रासदायक करणं
हा गुन्हा.

अ.भा. अंधश्रध्दा निर्मूलन समिती





जारणमारण,
करणी किंवा
चेटूक केल्याच्या
नावाखाली एखाद्या
व्यक्तिला मारहाण
करणं, नग्नावस्थेत
धिंड काढणं किंवा
तिच्या रोजच्या
व्यवहारांवर बंदी
घालणं हा गुन्हा.




# कलम ८

मंत्राच्या सहाय्याने भूत पिशाच्चांना आवाहन करेन अशी धमकी देऊन सर्वसामान्य जनतेच्या मनात घबराट निर्माण करणं, एखाद्या व्यक्तीला शारीरिक इजा होण्यास भूताचा किंवा अतिंद्रिय शक्तीचा कोप असल्याचा समज करून देणं, घबराट निर्माण करणं, मृत्युची भीती घालणं हा गुन्हा.

अ.भा. अंधश्रध्दा निर्मूलन समिती




कुत्रा, साप,
विंचू चावल्यास
एखाद्या व्यक्तिला
वैद्यकीय उपचार
घेण्यापासून रोखून
त्याऐवजी तिला
अमानुष, अनिष्ट
व अघोरी कृत्य वा
उपाय करण्यास
प्रवृत्त करणं किंवा
मंत्रतंत्र-गंडेदोरे
असे उपचार
करणं हा गुन्हा.

# कलम १०




बोटाने शस्त्रक्रिया करून दाखवतो असा दावा करणं किंवा गर्भवती महिलांच्या गर्भाचं लिंग बदलून दाखवतो असा दावा करणं हा गुन्हा.

# कलम ११




स्वत:ला अलौकिक शक्ती असल्याचं वा आपण अवतार असल्याचं भासवून नादी लागलेल्या व्यक्तीस तू माझी गेल्या जन्मीची पत्नी, प्रेयसी वा प्रियकर होता असं सांगून लैंगिक संबंध ठेवणं. तसंच मुल नं होणाऱ्या स्त्रीला अलौकिक शक्तिद्वारे मूल होण्याचं आश्वासन देऊन तिच्याशी लैंगिक संबंध ठेवणं हा गुन्हा.

अ.भा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती




एखाद्या मानसिक विकलांग व्यक्तिमध्ये अलौकिक शक्ती असल्याचं भासवणं, त्याद्वारे त्या व्यक्तिचा वापर धंदा, व्यवसायासाठी करणं हा गुन्हा.

विज्ञान ! चिकित्सा !! आत्मविश्वास !!!

# जादूटोणा विरोधी कायदा अंमलबजावणी साठी सहकार्य करा

**महाराष्ट नरबळी आणि इतर अमानुष,अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम 2013 अन्वये खालील बाबींची जाहिरात,आचरण,प्रचार किंवा प्रचालन करणे दंडणीय अपराध आहे**

अनुसुची-३ अलौकीक शक्तीची कृपा मिळविण्याच्या हेतुने,ज्यामुळे जिवाला धोका निर्माण होतो किंवा शरीरावर जिवघेण्या जखमा होतात, अशा अमानुष,अनिष्ट व अघोरी प्रथांचा अवलंब करणे आणि अशा प्रथांचा अवलंब करण्यासाठी इतरांना प्रवृत्त करणे,उत्तेजन देणे किंवा सक्ती करणे.

अनुसुची-८ मंत्राच्या सहायाने भूत पिशाच्चांना आवाहन करून किंवा भूत पिशाच्चांना आवाहन करील अशी धमकी देवून सर्वसामान्य जनतेच्या मनात घबराट निर्माण करणे, एखाद्या व्यक्तीला शारीरीक इजा होण्यास भूताचा किंवा अतिंद्रीय शक्तीचा कोप असल्याचा समज करूण देणे, आणी तिला वैद्यकिय उपचार घेण्यापासून रोखून, त्या ऐवजी तिला अमानुष, अनिष्ट व अघोरी कृत्य वा उपाय करण्यास प्रवृत्त करणे, अथवा मंत्रतंत्र, चेटूक, जादूटोणा अथवा अमानुष कृत्ये करून किंवा तसा आभास निर्माण करून एखाद्या व्यक्तीला मृत्यूची भीती घालणे,शारीरीक वेदना करण्याची किंवा तिचे आर्थीक नुकसान करण्याची धमकी देणे

वरील शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही कृतीस किंवा अपराधास जी व्यक्ती अपप्रेरणा देईल किंवा वरीलपैकी कोणतीही कृती किंवा अपराध करण्याचा प्रयत्न करेल, तिने तो अपराध केला असल्याचे मानण्यात येईल आणी दोष सिध्द झाल्यानंतर अशा व्यक्तीस कमीत कमी 6 महीने ते 7 वर्षापर्यंत मुदतीच्या कारावासाची आणी 5000/- रूपये ते 50000/- रूपयांपर्यंत दंडाची शिक्षा होवू शकेल. हे अपराध दखलपात्र व अजामीनपात्र असतील. सूज्ञ नागरिकांनी अधिक माहिती व मदती साठी जवळच्या पोलीस स्टेशनला संपर्क करून अंमलबजावणीसाठी सहकार्य करा, ही नम्र विनंती.

अंनिस

राष्ट्रीय कार्यकारिणी

**श्याम मानव**
राष्ट्रीय सघंटक
9371014832

**हरिश देशमुख**
महासचिव
9970169083

**उमेशबाबु चौबे**
कार्याध्यक्ष
9890804832

**मधुकर कांबळे**
अध्यक्ष
9930312494

**सुरेश झुरमुरे**
प्रकल्प संचालक
9422823335

महाराष्ट्र कार्यकारिणी

**दिलीप सोळंके**
महाराष्ट्र संघटक
9423606580

**अशोक घाटे**
राज्य सह संघटक
9420104184

**प्रशांत सपाटे**
सचिव
9422122080

**पुरूषोत्तम आवारे**
प्रसिध्दी प्रमुख
9892162248

**प्रवीण गांगुर्डे**
संघटक - उत्तर पश्चिम महाराष्ट्र
9890631933

**छाया सावरकर**
महिला संघटक
8928637530

मुंबई-कोकण विभाग कार्यकारिणी

**चंद्रकांत सर्वगोड**
मुंबई संघटक
९३२३११६९५०

**सुर्यकांत जाधव**
मुंबई सहसंघटक
8108231255

**संदिप पवार**
मुंबई सचिव
9967834831

**कैलासचंद्र मोहिते**
कोकण संघटक
९८६९१००६३७

**शशिकांत गमरे**
कोकण सचिव
९८३३६३४०६२

**रविंद्र खानविलकर**
समन्वयक
9969131091

विदर्भ महाराष्ट्र

**हरिभाऊ पाथोडे**
विदर्भ संघटक (पूर्व)
9421721788

**किशोर वाघ**
विदर्भ संघटक ( पश्चिम)
9822689635

**ई. एच. पठाण**
सचिव ( पश्चिम )
9665133132